गांवकरी
www.gavakari.net
29 May 2025 - Page 2





# के. के. वाघतर्फे उन्हाळी शिबिर

नाशिक : वार्ताहर

के के वाघ शिक्षणसंस्था संचालित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक येथील एआयसीटीई आयडिया लॅबच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी पंधरा दिवसीय उन्हाळी शिबिर उत्साहात पार पडले.

या शिबिरात नाशिक शहरातील विविध शाळांतील २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी शिबिरात ऑगमेंटेड रिॲलिटी, व्हर्चुअल रिॲलिटी, ड्रोन टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स, थ्रीडी प्रिंटिंग, लेझर कटिंग अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यात आली. याशिवाय विद्यार्थ्यांनी दोन चाकी रोबोटिक वाहन तयार करण्याचा अनुभव घेतला. तसेच प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले.

शिबिराच्या सांगता कार्यक्रमावेळी विभागप्रमुख डॉ. प्रीती भामरे, मुख्याध्यापिका अश्विनी पवार, डॉ. निशा इंदाईत, डॉ. पद्माकर पवार, डॉ. प्रशांत कुशारे व डॉ. रवींद्र मुंजे उपस्थित होते.

शिबिरासाठी संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी मार्गदर्शन केले.